वाचले – महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील राजपत्र दिनांक ०४ जून १९९८.

---

क्र.मह.कार्या-१/आस्था-२/आरआर - ५५६/२०१४
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
दिनांक - १७ मे २०१४

विषय – तलाठी संवर्गातून मंडल अधिकारी संवर्गात पदोन्नतीची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत सन २०१४

**ज्ञा प न**

सांगली जिल्हयातील तलाठी संवर्गातील कर्मचा-यांची मंडल अधिकारी संवर्गात पदोन्नतीची प्राथमिक सेवा ज्येष्ठता यादी या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मह.कार्या-१/आस्था-२/आरआर-११७/२०१४ दिनांक १० फेब्रुवारी २०१४ अन्वये प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर प्रसिध्द करणेत आलेल्या प्राथमिक ज्येष्ठता यादीवर दिनांक २५ फेब्रुवारी २०१४ अखेर हरकती मागविणेत आलेल्या होत्या. त्याप्रमाणे एकूण ७ कर्मचा-यांच्या हरकती या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. सदर हरकतीमधील कागदपत्रांची पडताळणी करून, हरकतींचा तपशिल **परिशिष्ठ अ** मध्ये दर्शविणेत आलेला आहे. तसेच ज्येष्ठता यादीमध्ये आवश्यक तो बदल करणेत आलेला असून, त्यानुसार अंतिम ज्येष्ठता यादी तयार करण्यात आलेली आहे. सदर अंतिम ज्येष्ठता यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावी, व केले कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

सदरची ज्येष्ठता यादी जिल्हाधिकारी कार्यालयाचे वेबसाईट www.sangli.nic.in वर पहाणेस उपलब्ध आहे.

**सही/- xxx**
**(दीपेन्द्र सिंह कुशवाह)**
**जिल्हाधिकारी सांगली**

प्रति,

1. उपविभागीय अधिकारी वाळवा – इस्लामपूर / मिरज / विटा / जत / कडेगांव
2. तहसिलदार मिरज / तासंगाव / कवठेमहांकाळ / जत / विटा / कडेगांव / पलूस / आटपाडी / वाळवा / शिराळा
3. शाखा प्रमुख, पुनर्वसन / संगायो शाखा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

प्रत - मा. आयुक्त पुणे विभाग पुणे यांना (महसूल आस्थापना) यांना माहितीसाठी सविनय सादर.

१७/५/१४

**जिल्हाधिकारी सांगली करिता**

## परिशिष्ठ – अ

| अ.क्र. | हरकत दाराचे नांव व पद | हरकतीचे स्वरूप | मान्य / अमान्य |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | श्री एस. एम. कांबळे, तलाठी | प्रसिध्द केलेल्या पदोन्न्तीच्या प्राथमिक सेवा ज्येष्ठता यादीतील अ.क्र. ३७ वरील श्री गोरखनाथ विठोबा पाटसुते यांची जन्म तारीख ०५.०३.१९६५ असून तलाठी म्हणून नेमणूक दिनांक ०७.०९.१९९२ अशी आहे. त्यांना सुट मिळालेची तारीख १६.०९.२०१० व पदोन्नतीसाठी धरावयाची ज्येष्ठता तारीख दिनांक १२.०९.२००६ ही चुकीची नमूद केली आहे.<br>तसेच माझे नांव अ.क्र. ५८ ला शिवाजी माणकू कांबळे असून माझी जन्म तारीख ०१.०६.१९६२ अशी आहे. मी १९.०४.१९८३ रोजी तलाठी वाडापेठ ता. राजापूर जि. रत्नागिरी येथे हजर झालो होतो. तेथून आंतरविभागीय बदलीने दिनांक १९.०२.१९९१ रोजी सहा. तलाठी शिराळा येथे हजर झालो होतो. मला वयाची ४५ वर्षे पुर्ण झालेली तारीख १.०५.२००७ असून महसूल अर्हता परिक्षा सूट २२.०९.२००७ रोजी देणेत आलेली आहे.<br>**श्री पाटसुते यांना वयाची ४५ वर्षे पुर्ण झालेची तारीख दि. ०२.०५.२०१० अशी आहे. व महसूल अर्हता परिक्षा सुट देण्याची तारीख चुकून १२.०६.२००६ अशी देण्यात आलेली आहे. ती चुकीची आहे.** याबाबत पडताळणी होवून श्री पाटसुते यांचे नांव अंतीम यादी तयार करताना माझे नावानंतर घेवून अंतीम सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्याबाबत माझी विनंती आहे. | श्री पाटसुते यांची जन्म तारीख ०३.०५.१९६५ असून त्यांना वयाची ४५ वर्षे ०२.०५.२०१० रोजी पुर्ण होत आहेत. माहे एप्रिल २०१० ची महसूल अर्हता परिक्षा दिनांक ०७.०६.२०१० ते ११.०६.२०१० या कालावधीत पार पडलेली आहे. त्यामुळे श्री पाटसुते यांना महसूल अर्हता परिक्षा सूट दिनांक १२.०६.२००६ ऐवजी १२.०६.२०१० मिळणे आवश्यक आहे.<br>**हरकत मान्य** |
| २ | १) श्री पी. वाय. ओमासे तलाठी<br>२) श्री एस. डी. हांगे तलाठी<br>३) श्री पी. टी. ओमासे तलाठी | प्रसिध्द केलेल्या पदोन्नतीच्या प्राथमिक ज्येष्ठता यादीमधील मयत कर्मचारी यांचे नावे नमुद उदा. अ.क्र. ८, २५ व ३५ तरी मयत कर्मचारी यांची नांवे पडताळणी करून यादीमधून कमी होणेस विनंती आहे. | अ.क्र. ८, २५ व ३५ वरील कर्मचारी मयत असलेबाबत उपविभागीय अधिकारी मिरज यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे.<br>**हरकत मान्य** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रसिध्द केलेल्या पदोन्नतीच्या प्राथमिक ज्येष्ठता यादीमधील सेवा निवृत्त कर्मचारी यांची नावे नमुद उदा. अ.क्र. २, ५, २३ तरी सेवा निवृत्त कर्मचारी यांची नांवे पडताळणी करून यादीमधून कमी होणेस विनंती आहे. | अ.क्र. २, ५ व २३ वरील कर्मचारी स्वेच्छा सेवानिवृत्त असलेबाबत उपविभागीय अधिकारी मिरज यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. **हरकत मान्य** |
| | | प्रसिध्द केलेल्या पदोन्नतीच्या प्राथमिक ज्येष्ठता यादीमधील अ.क्र. ९, १०, ११, ५०, ५१, ५६, ६२, ६३, ७१, ७५, ७७, ७८, ८०, ९६, ९७, ९८ हे आमच्या नंतर महसुल अर्हता परिक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. त्यामुळे त्यांची नावे आमच्या नंतर सेवा ज्येष्ठता यादीमध्ये येणे आवश्यक होते. पण त्यांची नांवे आमच्या अगोदर सेवा ज्येष्ठता यादीमध्ये समाविष्ठ करणेत आली आहेत. त्यामुळे सदर यादीची पडताळणी होवून सेवा ज्येष्ठता यादी करावी. ही विनंती | अर्जदार यांनी ज्येष्ठता यादीतील अ.क्र. ९, १०, ११, ५०, ५१, ५६, ६२, ६३, ७१, ७५, ७७, ७८, ८०, ९६, ९७, ९८ यांचे ज्येष्ठतेबाबत हरकत घेतली आहे. परंतु, सदर कर्मचारी तलाठ्याच्या संवर्गामधून मंडल अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा नियम १९९८ मधील नियम ०५ अन्वये परीक्षा उत्तीर्ण झालेले असलेने त्यांची ज्येष्ठता अबाधित राहिलेली आहे. **हरकत अमान्य** |
| ३ | सौ. एम. आय. मुलाणी, तलाठी मल्लेवाडी | तलाठी संवर्गातून मंडल अधिकारी संवर्गात पदोन्नतीच्या यादीमध्ये माझे नांव अ.क्र. १३१ वर असून माझी जन्म तारीख ०१.०६.१९६८ अशी नोंद झाली आहे.<br>माझी जन्म तारीख ०१.०६.१९६८ एवजी दिनांक १३.०७.१९६९ अशी दुरूस्ती करावी. सोबत सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत व मा. उपविभागीय अधिकारी मिरज यांचेकडील आदेशाची प्रत सविनय सादर. | श्रीमती मुलाणी यांनी त्यांची जन्म तारीख दिनांक १३.०७.१९६९ अशी असलेबाबत पुरावा सादर केलेला आहे. **हरकत मान्य** |